# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission


निर्णय क्र. मविनिआ/माअअ/अपील/०१/२०२०/१६५ दिनांक-२०.०२.२०२०

| | |
|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | :१४.०१.२०२० |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक | :१४.०१.२०२० |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | :२४.०१.२०२० |
| प्रथम अपील निकाली काढल्याचा दिनांक | :२०.०२.२०२० |

**समक्ष प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकारी अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत.)**

**अपील क्र. ०१/२०१९**

**अपीलकर्ता:** श्री. यदुनाथ सहादूर प्रजापती

**विरुदध**

**प्रतिवादी :** जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई

**अपिलाचे तथ्य :-**

१) अपिलकर्ता यांनी दिनांक १४.०१.२०२० रोजी माहिती अधिकार कायद्याअंर्तगत अर्ज केला. त्यानुसार प्रतिवादी यांनी दिनांक १४.०१.२०२० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली. त्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी दिनांक २४.०१.२०२० रोजी वरील अपिल दाखल केले आहे.

२) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिनांक २७.०१.२०२० रोजी नोटिस पाठवून दिनांक ०३.०२.२०२० रोजी सुनावणी आयोजीत करून सुनावणी घेतली. सुनावणी च्या वेळी अपिलार्थी व माहिती अधिकारी हे हजर होते. अपिलार्थी व माहिती अधिकारी यांनी आपले मौखिक निवेदन सादर केले.

३) अपिलातील दस्तऐवज व निवेदनावरुन अपिलातील मुद्दे खालील प्रमाणे आहेत -

<u>मागितलेली माहिती:-</u>

१) सदर माहिती अधिकार अर्जात अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांना दि. १३.०१.२०२० रोजी च्या अर्जाद्वारे अदानी ईलेक्ट्रीसिटी मुंबई लिमिटेड मध्ये बोगस कागदपत्राच्या आधारे घेतलेली वीज मीटर अर्ज व सोबत दिलेले कागदपत्रे संपूर्ण फाईलीचे निरीक्षण व हवी असलेली कागदपत्राची सत्यप्रत व संपूर्ण तपशीलवार ३ मुद्यांची माहिती मागीतली होती.

२) दि.१३.०१.२०२० रोजीचा अपिलार्थी यांचा अर्ज, माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये कलम ६ पोटकलम (३) प्रमाणे दि.१४.०१.२०२० रोजी अदानी ईलेक्ट्रीसीटी मुंबई लिमिटेड कडे हस्तांतरीत केला.

३) अदानी ईलेक्ट्रीसीटी मुंबई लिमिटेड कडून दि. १७.०१.२०२० रोजीचे पत्रान्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये २ (त्र) अदानी पावर महाराष्ट्र लिमिटेड कंपनीवर माहिती अधिकार कायदा लागू होत नाही असे अपिलार्थींना कळविले. सोबत दि.१३.१०.२०११ चे मा. उच्च न्यायालयाचे आदेशाची प्रत अपिलार्थी यांनी पाठविली.

<u>जन माहिती अधिकारी यांचे उत्तर :-</u>

माहिती अधिकारी कायदा अंर्तगत कलम ६ (३) अन्वये अदानी ईलेक्ट्रसिटी मुंबई लिमीटेडला अर्ज हस्तांरण केले.

<u>प्रथम अपील दाखल करण्याचे कारण :-</u>

शासकीय जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, व अदानी ईलेक्ट्रीसीटी मुंबई लिमिटेड यांनी अपिलार्थींना सदर अर्जावर खोटी, असमाधानकारक व जाणूनबुजून चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याबद्दल अपिल करण्यात आल्याचे नमूद केले.

<u>अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे :-</u>

अपिलार्थी यांनी मागीतलेली माहिती हि अदानी ईलेक्ट्रीसीटी मुंबई लिमिटेड या कंपनीसी संबधित असल्याने, माहिती अधिकार अर्ज त्याचेकडे हस्तांतरण करण्यात आला.

अपिलार्थी यांना त्या पत्राची परस्पर प्रत सुध्दा माहिती अधिकारी यांनी पाठवीली असे दिसून येते. त्यानंतर अदानी ईलेक्ट्रीसीटी मुंबई लिमिटेड यांनी अपिलार्थी यांना दि.१६.०१.२०२० रोजी माहिती पूरविली ते येथे प्रमाणे :- मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी आदेश दि.१३.१०.२०११ अन्वये महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाचे आदेश दि.१२.०३.२०११ च्या अन्वये अंदानी ईलेक्ट्रीसीटी मुंबई लिमिटेड (पूर्वीची रिलायंन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमीटेड) हि

Public authority असल्याचे वर स्थगीती दिलेली आहे, करिता अंदानी ईलेक्ट्रीसीटी मुंबई लिमिटेड ला माहिती अधिकार कायदा लागू होत नाही असल्याचे कळविले आहे.

मा.उच्च न्यायालयाने सुध्दा त्यांचे आदेशात असे नमूद केले आहे कि, अदानी ईलेक्ट्रीसीटी मुंबई लिमिटेड कलम २(a) च्या नुसार Public authority च्या व्याख्येत येत नाही.

हि सबब माहिती अपिलार्थी याना पूरविण्यात आली आहे व मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची प्रत अपीलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

तथापि, अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान असे निदर्शनास आणून दिले की. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशात अदानी ईलेक्ट्रीसीटी मुंबई लिमिटेड यांचे नाव नसून, तिथे रिलायंन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमीटेड चे नाव आहे, करीता हे आदेश लागू होत नाही व ते चूकीचे आहे.

वरील मुद्दाच्या अनुषंगाने, अदानी ईलेक्ट्रीसीटी मुंबई लिमिटेड यांनी त्याच्या प्रत्रात मुद्दा क्र.२ मध्ये उल्लेख केला आहे, कि मा. आयोगाच्या दि. २८.०६.२०१८ चे प्रकरण क्र.१४०/१७ च्या आदेशानुसार रिलायंन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमीटेड चा विद्युत विरतण परवाना हा अदानी ईलेक्ट्रीसीटी मुंबई लिमिटेड यांच्या ताब्यात दिलेला आहे.

करिता वरिल कारण मिमांसे वरुन, असे दिसून येते कि, अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली माहिती योग्य आहे.

मा. उच्च न्यायलयाचे अंतरित आदेश असतांनी वरिल विषयोक्त प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी, अथवा माहिती अधिकारी यांनी / अदानी ईलेक्ट्रीसीटी मुंबई लिमिटेड यांनी पूरविलेल्या माहितीस हस्तक्षेप करण्याची गरज नाही.

**जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.**

<u>निर्णय</u>

अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**(अनिलकुमार उके)**

**संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**

प्रति,
श्री. यदुनाथ सहादूर प्रजापती
कमल अपार्टमेंट, बी-३, पहला मजला,
जनसेवा बँकेच्या समोर, वामनराव सावंत मार्ग,
दहीसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८.

**(अनिलकुमार उके)**

**संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**